# बोर्ड प्रश्नपत्रिका : जुलै २०१५

## भूगोल आणि अर्थशास्त्र

**वेळ : २ तास** **एकूण गुण : ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.
iii. प्र.३ (अ), (ब), (क) संपूर्णपणे नकाशा, आलेख पुरवणीवरच सोडवावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडावा.
iv. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.
v. १ ते ४ प्रश्न भूगोलाचे व ५ ते ७ प्रश्न अर्थशास्त्रावरील आहेत.
vi. आवश्यक तेथे सुबक आकृत्या काढा व नकाशाचा वापर करा.

**१. (अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य तो पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** **[३]**

१. पंजाब व हरियाणा मैदान ________ उत्पादनात अग्रेसर आहे.
(बाजरी, गहू, तेलबिया, ऊस)

२. ________ लोक सिंधू खोऱ्यातील वरच्या भागात भटके गुराख्याचे जीवन जगतात.
(गड्डी, चंबा, गुज्जरी, लडाखी)

३. तराई क्षेत्र ________ प्रदेश आहे.
(जंगली, दलदलीचा, नापीक, वाळवंटी)

**(ब) 'अ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** **[३]**

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | शेळी | अ. | पायऱ्यांची विहीर |
| २. | बावडी | ब. | शिखांचे पवित्र स्थळ |
| ३. | हरमंदिर साहिब | क. | लोही |
| | | ड. | छोटा हौद |

**२. (अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) :** **[४]**

१. प्रादेशिकीकरण अत्यंत आवश्यक आहे.
२. अतिपर्जन्य असलेल्या प्रदेशात जांभी मृदा आढळते.
३. हिमालयातील जवळजवळ सर्व नद्या बारमाही स्वरूपाच्या आहेत.
४. मळ्यांची शेती मुख्यत: पश्चिम घाटाच्या दक्षिण भागात एकवटली आहे.

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणत्याही दोन) :** **[४]**

१. उंट सफरी
२. कोकण किनारपट्टी
३. पूर्व हिमालय

**३. (अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे साधा स्तंभालेख काढा :** **[२]**

| वर्ष | २०००-२००१ | २००१-२००२ | २००२-२००३ | २००३-२००४ | २००४-२००५ |
|---|---|---|---|---|---|
| दरडोई उत्पन्न सुमारे (रुपयांमध्ये) | १८,००० | १९,००० | २०,००० | २४,००० | २७,००० |

**(ब) खालील नकाशाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[२]**




**प्रश्न :**

१. कोणत्या दोन नद्यांच्या दरम्यान दोआब प्रदेश आहे?

२. गंगा नदीच्या एका उपनदीचे नाव लिहा.

३. आकृतीच्या वायव्य दिशेला दाखविलेल्या क्षेत्राचे नाव लिहा.

४. गंगेच्या मैदानी प्रदेशाचा उतार कोणत्या दिशेस आहे?

**(क) तुम्हास पुरविलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील बाबी दाखवा व त्यांना नावे द्या (संकेत सूची आवश्यक) (कोणतेही दोन) :** **[२]**

१. अरुणाचल प्रदेश

२. भारतातील सर्वाधिक उंच शिखर

३. पश्चिम घाट

४. कन्याकुमारी

**४. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

१. राजस्थानमधील जलसंचयाच्या पारंपरिक पद्धती लिहा.

२. दख्खनच्या पठारावरील नैसर्गिक वनस्पती आणि प्राणिजीवन यांची सविस्तर माहिती लिहा.

३. पश्चिम घाट व किनारी मैदानी प्रदेशाच्या पर्यावरणीय समस्यांचे स्पष्टीकरण करा.

**५. रिकाम्या जागी योग्य तो पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा:** **[२]**

१. पर्याप्त लोकसंख्या देशातील लोकसंख्येचे ________ आकारमान दर्शवते.

(आदर्श, न्यून, अतिरिक्त)

२. तृतीय क्षेत्र याला ________ क्षेत्र असेही म्हणतात.

(कृषि, औद्योगिक, सेवा)

**६. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन) :** **[६]**

१. श्रमप्रधान तंत्र कशास म्हणतात?

२. बँक दर म्हणजे काय ते स्पष्ट करा.

३. अन्नभेसळ म्हणजे काय?

४. भाववाढीची मुख्य दोन कारणे कोणती?

५. ग्राहक संरक्षण कायद्याची मुख्य उद्दिष्टे सांगा.

**७. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा :** **[४]**

१. वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होण्यास कारणीभूत असलेले कोणतेही चार घटक लिहा.

२. ग्राहकांची कर्तव्ये स्पष्ट करा.